सं.फौ. प्र.क्र. ६२४/२०१६

नि.क्र.७७ लगत

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, -

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास फिर्यादी यांचे विधीज्ञ श्रीमती आर. जे. मिनासे यांचे तर्फे शपथेवर सुरु -**

मी अभिलेखावर प्रतिज्ञालेख नि.क्र. ७७ वर दाखल केला आहे. त्यातील मजकू खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझे वकीलांची सही आहे. त्यानंतर मी आरोपीकडे कर्ज मागणीसाठी गेले असता आरोपी यांनी मला दि. ०१.०३.२०१६ रोजी रुपये १,००,०००/- चा धनादेश दिला. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि.क. ८५** देण्यात येत आहे. त्यानंतर बँकेमध्ये सदरचा चेक वटविण्यासाठी टाकला असता तो "फंड इनसफीशीयंट" म्हणून वापस आला. दि.१४.०३.२०१६ रोजीच्या मेमोला **नि.क. ८६** देण्यात येत आहे. त्यावर बँकेचा सही व शिक्का आहे. मी आरोपीला रजीस्टे पोस्टाव्दारे माझे वकीमार्फत दि. ३१.०३.२०१६ रोजी नोटीस पाठविली. त्यावर माझे वकीलांची सही आहे.

०२. स्थळप्रतीस **नि.क. ८७** देण्यात येत आहे. मी अभिलेखावर पोहोच पावती दाखल केली आहे. त्यास **नि.क. ८८** देण्यात येत आहे. त्यानंतर बंद लिफाफा आणि त्याची पोहोच पावती मी अभीलेखावर दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **नि.क. ८९ व ९०** देण्यात येत आहे. बंद लिफाफा न्यायालयासमोर फोडण्यात आला. त्यात मी आरोपीला माझे वकीलांमार्फत पाठवविलेली नोटीस आहे. त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि.क. ९१** देण्यात येत आहे. आरोपीने दि. १५.०१.२०१४ रोजी जवाहर अर्बन सोसायटी मध्ये कर्ज माकणीचा अर्ज केला होता. त्यावर आरोपीची व जमानतदाराची सही आहे. त्यास **नि.क. ९२** देण्यात येत आहे. मी अभिलेखावर जमानतदार यांचे माहितीपत्र दाखल केले आहे. त्यावर जमानतदाराची सही आहे. त्यास **नि.क. ९३** देण्यात येत आहे. मी अभिलेखावर करारपत्र दाखल केले आहे. ते करार आरोपी आणि संस्थेमध्ये झाला होता. त्यावर आरोपी, जमानतदार, साक्षीदार आणि

व्यवस्थापक यांचे सहया आहेत. त्यास **नि.क. ९४** देण्यात येत आहे. त्यानंतर जमानतदार व आरोपी यांनी एक वचनचिठ्ठी संस्थेला करुन दिली होती. त्यावर आरोपी आणि जमानतदार यांची सहीआहे. त्यास **नि.क. ९५** देण्यात येत आहे.

०३. आरोपी याने त्याचे सहीचा नमुना दाखल केला आहे. त्यावर जमनातदाराची व आरोपी यांचे सही आहे. त्यास **नि.क.९६** देण्यात येत आहे. दि. ३०.०९.२०१६ रोजी संस्थेने मला प्रकरण चालविण्यासाठी अधिकार दिले होते त्याचे अधिकारपत्र मी अभिलेखावर दाखल केले आहे. त्यावर माझी व व्यवस्थापक व अध्यक्ष यांची सही आहे. त्यास **नि.क. ९७** देण्यात येत आहे. मी अभिलेखावर संस्थेने मला प्रकरण चालविण्यासाठी अधिकार दिले त्याची प्रोसीडींग बुकची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यावर अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक यांचे सहया आहेत. त्यास **नि.क. ९८** देण्यात येत आहे. आरोपी यांचे दि. २१.०२.२०१४ ते दि. २५.०१.२०२४ पर्यंतची संगणीकृत खातेउतारा मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यासोबत संस्थेने दिलेले सर्टीफीकेट मी दाखल केले आहे. त्यास एकत्रीतरित्या **नि.क. ९९** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण

**उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए.टी. देशमुख यांचे मार्फत**

आरोपी चे विधिज्ञ श्री ए.टी. देशमुख यांचे तोंडी विनंती वरुन उलट तपासा पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

SMITA HARIDAS UKEY
Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.07.05 16:56:24 +0530

दि. ०४.०७.२०२५

( श्रीमती एस. एच. उके)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग -
(कोर्ट क्र.२ ) चिखली.